# राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस

**डॉ.**आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी,नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे ५२ वा **राष्ट्रीय** सेवा योजना स्थापना दिवस २९/९/२०२१ ला साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.बी.ए.मेहेरे,प्रमुख अथिती म्हणून IPS विनिता शाहू,प्रमुख मार्गदर्शक म्हणून नागपूर महानगर पालिकेचे उपआयुक्त श्री मिलिंद मेश्राम,पी.डब्लू.एस महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.नरेंद्र बागडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रज्वल कोडापे,आरती घोटकर,तर आभार शिया मिश्रा यांनी केले.या कार्यक्रमाला राष्ट्रीय सेवा योजनेचे ७५ विध्यार्थी उपस्थित होते.







DR. AMBEDKAR COLLEGE
Dikshabhoomi, Nagpur
ESTD - 1964
NSS
(National Service Scheme)
FOUNDATION DAY


DR. AMBEDKAR COLLEGE
ESTD - 1964


DR. AMBEDKAR COLLEGE
Dikshabhoomi, Nagpur
ESTD - 1964
NSS
(National Service Scheme)
FOUNDATION DAY


DR. AMBEDKAR COLLEGE
Dikshabhoomi, Nagpur
NSS
(National Service Scheme)
FOUNDATION DAY
Samavesh
ESTD - 1964
DR.AMBEDKAR COLLEGE
DEEKSHABHOOMI
NAGPUR


DR. AMBEDKAR COLLEGE
Dikshabhoomi, Nagpur
NSS
(National Service Scheme)
DR. AMBEDKAR COLLEGE
DEEKSHABHOOMI
NAGPUR


DR. AMBEDKAR COLLEGE
Dikshabhoomi, Nagpur
NSS
(National Service Scheme)
GPS Map Camera
Google
Nagpur, Maharashtra, India
Deekshabhoomi, Nagpur,
Maharashtra 440010, India
Lat N 21° 7' 45.4008" Long E 79° 4' 3.72"
29/09/21 12:43 PM
30.99° C
311° NW
25.0 µT


GPS Map Camera
Overhead
Water Tank
omi
Google
Nagpur, Maharashtra, India
E-Leap - The DAIMSR Center For Entrepreneurship, 3rd Floor, DAIMSR, Deekshaboomi, Nagpur, Maharashtra 440010, India
Lat N 21° 7' 46.182" Long E 79° 4' 3.6552"
29/09/21 12:23 PM
28.99° C
204° SW
35.0 µT



# विद्यार्थी सशक्त समाज निर्माण करू शकतात

## विनिता शाहू : डॉ. आंबेडकर महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचा वर्धापन दिन

**नागपूर, ता. १ :** समाजातील सामाजिक विषमता दूर करून सशक्त समाज निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचा (रासेयो) विद्यार्थी हा सदैव तत्पर असतो. बरेचदा तरुण पिढी पोलिसांना घाबरत असतात. परंतु चांगल्या लोकांना पोलिसांना घाबरण्याची गरज नाही. उलट पोलिसांचे नंबर स्वतः जवळ ठेवून समस्यांचे निराकरण कसे करता येऊ शकते त्यासाठी युवकांनी कायम पोलिसांच्या संपर्कात राहिले पाहिजे, असे प्रतिपादन आयपीएस विनिता शाहू यांनी केले.




**दीक्षाभूमी : डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात बोलताना विनिता साहू, शेजारी प्राचार्य डॉ. बी ए मेहेरे, मिलिंद मेश्राम, डॉ.नरेंद्र बागडे, डॉ. रवींद्र तिरपुडे.**

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५२ व्या वर्धापन दिनानिमित्त उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. बी ए मेहेरे, प्रमुख अतिथी म्हणून नागपूर महानगरपालिकेचे उपायुक्त मिलिंद मेश्राम, पी.डब्ल्यू. एस कॉलेजचे उपप्राचार्य डॉ.नरेंद्र बागडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते. त्या पुढे म्हणाल्या, देशात घडणाऱ्या घटना व अधिकारांबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक भावना विकसित होण्यास मदत होते. महानगरपालिकेचे उपायुक्त मिलिंद मेश्राम म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी संकटाच्या काळात देशाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहतात. कोरोनाच्या काळात निःस्वार्थपणे सेवा देण्याचे काम रासेयो.च्या स्वयंसेवकांनी केले. हा स्वयंसेवक देशाचे भविष्य आहे. डॉ.नरेंद्र बागडे यांचे ही यावेळी भाषण झाले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य बी ए मेहेर म्हणाल्या, रासेयोच्या विद्यार्थ्यांनी समाजात आपली एक वेगळी ओळख निर्माण करावी. तसेच संकटाच्या वेळी सामाजिक कार्यात अग्रेसर असावे. हे विद्यार्थी देशाचे उज्ज्वल भविष्य आहेत. प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ.रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन प्रज्वल कोडापे, आरती घोटकर व आभार शीया मिश्रा या विद्यार्थ्यांनी केले.

---

पुण्य नगरी

# 'एनएसएस'चे विद्यार्थी सशक्त समाज निर्माण करू शकतात : शाहू

**नागपूर :** राष्ट्रीय सेवा योजनेच्या (एनएसएस) ब्रीदवाक्याप्रमाणे कार्य केल्यास विद्यार्थी समाजातील सामाजिक विषमता दूर करून सशक्त समाज निर्माण करू शकतात, असे मत परिमंडळ-२ च्या पोलीस उपायुक्त विनीता शाहू यांनी दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५२ व्या वर्धापनदिन कार्यक्रमात व्यक्त केले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. मेहरे तर प्रमुख अतिथी म्हणून मनपा उपायुक्त मिलिंद मेश्राम, पीडब्ल्यूएस महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नरेंद्र बागडे उपस्थित होते.

शाहू पुढे म्हणाल्या, आजची तरुणपिढी पोलिसांना घाबरते. समस्यांचे निराकरण कसे करता येईल यासाठी नेहमी पोलिसांच्या संपर्कात राहायला हवे. विद्यार्थ्यांना देशात घडणाऱ्या सर्व घटनांची जाणीव व अधिकाराबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सोशलमीडियापासून दूर राहून समाजकार्यात सहभागी व्हावे, असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन प्रज्वल कोडापे व आरती घोटकर यांनी केले. आभार शिया मिश्रा यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सशक्त समाज निर्माण करू शकतो

## आयपीएस विनिता शाहू यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन...




**नागपूर** ▪ माझ्यासाठी नव्हे तर तुमच्याकरिता या राष्ट्रीय सेवा योजनेच्या ब्रिदवाक्याप्रमाणे समाजातील सामाजिक विषमता दूर करून, सशक्त समाज निर्माण करू शकतो, असे प्रतिपादन आयपीएस विनिता शाहू यांनी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या ५२ वा वर्धापन दिन आयोजित करण्यात आला. त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून शाहू या बोलत होत्या. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. बी.ए. मेहेरे, प्रमुख अतिथी म्हणून नागपूर महानगरपालिकेचे उपायुक्त मिलिंद मेश्राम, पीडब्ल्यूएस कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. नरेंद्र बागडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. रवींद्र तिरपुढे मंचावर उपस्थित होते.

पुढे शाहू म्हणाल्या की, बरेचदा आजची तरुण पिढी पोलिसांना घाबरते, परंतु चांगल्या लोकांना पोलिसांना घाबरण्याची गरज नाही. उलट पोलिसांचे नंबर स्वतः जवळ ठेवून समस्यांचे निराकरण कसे करता येईल यासाठी पोलिसांच्या संपर्कात नेहमीच राहिले पाहिजे. याशिवाय देशात घडणाऱ्या सगळ्या गोष्टींची जाणीव व अधिकाराबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे वैशिष्ट्ये म्हणजे सोशल मीडियापासून दूर राहून सामाजिक कार्यात ते सहभागी होत आहेत, अशी भावना याप्रसंगी त्यांनी व्यक्त केली.

महानगरपालिकेचे उपायुक्त मिलिंद मेश्राम म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी संकटाच्या काळात देशाच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहतात. डॉ. नरेंद्र बागडे यांनीही व्यक्तिमत्व विकासाकरिता दिशा देणारे रासेयो हे महत्त्वाचे व्यासपीठ असल्याचे सांगितले. प्राचार्य डॉ. बी.ए. मेहेरे यांनी महाविद्यालयात रासेयोचे विद्यार्थ्यांना एक वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी समाजात चांगले काम केले पाहिजे, तसेच संकटाच्या वेळी सामाजिक कार्यात अग्रेसर असले पाहिजे. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे, संचालन प्रज्वल कोडापे, आरती घोटकर व आभार शीया मिश्रा या विद्यार्थ्यांनी केले.